**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे निबंधस्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा ११ डिसेंबरला**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे श्री चक्रधर स्वामी जयंतीनिमित्त 'आद्य समाजसुधारक श्री गोविंदप्रभू' या विषयावर आंतर महाविद्यालयीन निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेमध्ये अनेक महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून त्याचे गुणांकन पूर्ण झाले आहे. क्रमांकप्राप्त विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा दि. ११ डिसेंबर, २०१८ रोजी श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते होईल.

स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक नेहरु महाविद्यालय, नेरपरसोपंत, जि. यवतमाळची कु. तरन्नुम शफी बेग मिर्झा, द्वितीय क्रमांक नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेराची कु. शितल रामेश्वर उगले व से.फ.ला. हायस्कूल, धामणगांव रेल्वेचा निशांत शेषराव चव्हाण याला, तर तृतीय क्रमांक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीची कु. रेश्मा रमेशराव कोकणे व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावतीची जयश्री शेवतकर हिला प्राप्त झाला आहे. तसेच अमरावतीची कु. दिया शामपंत गणगणे व बडनेराचा सिद्धार्त बनसोड यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहे. क्रमांकप्राप्त विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह व ग्रंथ भेट देवून सन्मानित करण्यात येईल.

क्रमांकप्राप्त विद्यार्थ्यांचे व स्पर्धेत सहभागी सर्वांचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

दि. १४/११/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी